# प्रेस नोट

जा.क्रं.माहिती कक्ष/वार्तापत्र/२०१७,
कार्यालय पोलीस अधीक्षक, भंडारा,
दिनांक :— ०४/०२/२०१७.

## ''मोबाईल पोलीस स्टेशन''
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा :— पोलीस विभाग भंडारा चे वतीने भंडारा जिल्हयात पोलीस अधीक्षक, भंडारा श्रीमती विनीता साहू यांचे संकल्पनेतून ''मोबाईल पोलीस स्टेशन'' (फिरते पोलीस स्टेशन) लोकार्पन आज दिनांक ०४/०२/२०१७ रोजी झाले असून श्रीमती विनीता साहू, पोलीस अधिक्षक, भंडारा आणि अपर पोलीस अधीक्षक, रश्मि नांदेडकर हे स्वत: पोलीस स्टेशन साकोली येथील ग्राम विरसी येथे उपस्थित राहून उपस्थित नागरीकांना फिरते पोलीस स्टेशनचे महत्व पटवून दिले. पोलीस स्टेशन पवनी (ग्राम सिरसाळा), अडयाळ (ग्राम भावळ), तुमसर (ग्राम मेहगांव ), लाखनी (ग्राम पोहरा), लाखांदूर (ग्राम सरांडी बुज.), दिघोरी (ग्राम मानेगाव ), गोबरवाही (ग्राम लेडेंझरी), भंडारा (चांदणी चौक ), वरठी (ग्राम मोहगांव देवी), जवाहरनगर (ग्राम शहापूर),मोहाडी (ग्राम बेटाळा), हया ठिकाणी पोलीस स्टेशनचे अधिकारी व बिट जमादार यांचे मार्फतीने सदर मोहीम उत्कृष्टपणे राबविण्यात आलेली आहे. सदर मोहीमेस गावातील पोलीस पाटील, सरपंच, पोलीस मित्र, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष/सदस्यगण, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक आणि आजुबाजूचे गाव/ परिसरातील सर्व नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे. सदर मोहीमेत नागरीकांच्या एकूण ०७ तक्रारी नोंदविल्या असून तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले आहे.

(बी.आर.गाडे)
प्र.पोलीस उपअधीक्षक (गृह),
भंडारा.

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत,

**संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.